# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट दि. २३/०३/२०२०**

**विक्री करण्याकरीता देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतुस बाळगणारे तीन इसमांवर गुन्हे शाखा, युनिट ५ ची कारवाई देहुरोड व तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन येथे प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे दाखल अटक आरोपींकडुन ०७ देशी बनावटीचे पिस्टल व ०५ जिवंत काडतुसे असा एकुण ३,५७,५००/- चा मुद्देमाल जप्त**

दि १८/०३/२०१९ रोजी मा वरिष्ठांचे आदेशान्वये सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व गुन्हे शाखा, युनिट ५ कडील पोलीस कर्मचारी हे खासगी चारचाकी वाहनाने पेट्रोलींग करीत असताना **पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर गाडेकर, दयानंद खेडकर व धनंजय भोसले** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दोन इसम डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, डि.वाय.पाटिल कॉलेज रोड, रावेत येथे असलेल्या हॉटेल निसर्ग च्या बाहेर देशी बनावटीचे पिस्टल विक्रीकरीता घेवून येणार आहेत. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे यांनी सोबतचे कर्मचारी यांना सुचना देवून त्यांच्या दोन टिम तयार करुन सापळा लावला. काही वेळाने वरील वर्णनाप्रमाणे दोन इसम रिक्षा मधुन उतरुन निसर्ग हॉटेलचे लगत असलेल्या रोडचे कडेला जावून कोणाचीतरी वाट पाहत थांबले असल्याचे दिसुन आले. त्यांना पोलीसांचा सुगावा लागताच त्यांनी पळुन जाण्याचा प्रयत्न केला असता त्यांना पोलीस स्टाफचे मदतीने शिताफीने ताब्यात घेवून नाव व पत्ते विचारले असता त्यांनी त्यांची नावे **१. मनोज विष्णु जगताप, वय २० वर्षे धंदा शिक्षण, रा सर्वे क्र २८, नाईकनवरे सोसायटी, काळेपडळ रोड, हडपसर गाव, पुणे मुळ रा मारुती मंदिराचे मागे, तांबे यांचे घरामध्ये, गांधीनगर, ता कोपरगाव जि अहमदनगर व २. जॉन काशीनो परेरा, वय ३१ वर्षे रा नालेगाव वाघगल्ली, वाडा नं ६६ ता नगर जि अहमदनगर सध्या रा हालवाई गल्ली, हरबा तालीम, शकील शेख यांचे भाडयाचे घरामध्ये ता नगर जि अहमदनगर** असे असल्याचे सांगितले. त्यांची पंचांसमक्ष झडती घेतली असता अ.क्र. १ याचे कमरेस डावे बाजुस पॅन्टमध्ये खोचलेले एक देशी बनावटीचे काळे रंगाचे गावठी पिस्टल मॅक्झीनसह मिळुन आले तर त्याचे पॅन्टचे डावे खिशामध्ये दोन जिवंत काडतूसे मिळुन आली तर अ.क्र. २ याचे कमरेस डावे बाजुस एक तर उजव्या बाजुस एक अशी दोन गावठी पिस्टल मॅक्झीनसह मिळुन आले तर ट्रॅकपॅन्टचे उजव्या खिशामध्ये ०१ जिवंत काडतुस मिळुन आले. मनोज विष्णु जगताप व जॉन काशीनो परेरा यांना त्यांचेकडे मिळुन आलेले पिस्टल व जिवंत काडतुस जवळ बाळगण्याचा परवाना आहे अगर कसे या बाबत विचारणा केली असता त्यांनी प्रथम उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली त्यांस गुन्हे शाखा, युनिट ५ कार्यालय येथे नेवून सखोल तपास करता त्याने त्याचेकडे कोणत्याही प्रकारचा अग्निशस्त्र बाळगण्याचा परवाना नसल्याचे सांगुन सदर पिस्टल व जिवंत काडतुस हि विक्री करण्याकरीता आणल्याचे सांगितले.

सदर आरोपीवर **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं. १६३/२०२० भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३(२५) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन दाखल गुन्हयाचा पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे, गुन्हे शाखा, युनिट ५** हे करीत असताना आरोपींची ०५ दिवस पोलीस कोठडी घेवून आरोपींकडे सखोल तपास केला असता आरोपी नामे मनोज विष्णु जगताप याने त्याचे रहाते घरी लपवून ठेवलेले आणखी तीन देशी बनावटीचे मॅक्झीनसह असलेले पिस्टल काढून दिले आहे. आरोपीत नामे **मनोज विष्णु जगताप व जॉन काशीनो परेरा यांचेकडुन एकुण ०६ देशी बनावटीचे पिस्टल व ०३ जिवंत काडतुसे असा एकुण ३,०४,५००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.** आरोपी हे दि २३/०३/२०२० रोजीपर्यंत पोलीस कोठडीमध्ये आहे.

आणखी एका कारवाईमध्ये दि १४/०३/२०२० रोजी पोलीस कर्मचारी **ज्ञानेश्वर गाडेकर, दयानंद खेडकर व धनंजय भोसले** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम सोमाटणे फाटा येथे त्याचेकडे असलेले देशी बनावटीचे पिस्टल विक्रीकरीता येणार आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे यांनी सोबतचे कर्मचारी यांना सुचना देवून त्यांच्या दोन टिम तयार करुन सापळा लावून त्यास ताब्यात घेवून त्यास नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव **दिपक लिंबाजी सरोदे, वय ३१ वर्षे, रा सर्वे क्र. १०६ वैदवाडी, गोसावी वस्ती, म्हाडा कॉलनी, हडपसर, पुणे १३** असे असल्याचे सांगितले. त्याचेकडे **एक देशी बनावटीचे मॅक्झीनसह पिस्टल व दोन जिवंत काडतुसे असा ५३,०००/-** रुपये किंमतीचा माल मिळुन आला. त्याचेवर तळेगाव **दाभाडे पोलीस स्टेशन गु.र.नं. ९८/२०२० भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३(२५) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**गुन्हे शाखा, युनिट ५ चे पथकाने दोन कारवाईमध्ये एकुण ०७ देशी बनावटीचे पिस्टल व एकुण ०५ जिवंत काडतुसे असा एकुण ३,५७,५००/- रु किंमतीचा मुद्देमला जप्त करुन आरोपीतांवर १. तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गु.र.नं. ९८/२०२० भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३(२५) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ व २ देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं. १६३/२०२० भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३(२५) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ असे गुन्हे दाखल केले आहेत. दोन्ही गुन्हयांचा तपास सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे, गुन्हे शाखा, युनिट ५ हे करीत आहेत.**

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे मा. श्री सुधिर हिरेमट, सहा पोलीस आयुक्त गुन्हे १ मा. श्री राजाराम पाटील, सहा पोलीस आयुक्त गुन्हे २ मा. श्री श्रीधर जाधव, गुन्हे शाखा, युनिट-५ चे यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत, सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर गाडेकर, मयुर वाडकर, दत्तात्रय बनसुडे, दयानंद खेडकर, फारुक मुल्ला, संदिप टाकरे, धनराज किरनाळे, गणेश मालुसरे, सावन राटोड, धनंजय भोसले, स्वामीनाथ जाधव, भरत माने, नितीन बहिरट, राजकुमार इघारे, श्यामसुंदर गुट्टे, गोपाळ ब्रम्हांदे, राजेंद्र शेटे व नागेश माळी यांनी केली आहे.

**(बाळकृष्ण सावंत)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, युनिट -५, पिंपरी-चिंचवड




Pimpri Chinchwad Police Commissionerate
Celebrates
Maharashtra Police Raising Day
2nd to 8th Jan, 2020
गुन्हे शाखा, युनिट-५, पिंपरी-चिंचवड.


गुन्हे शाखा, युनिट-५, पिंपरी-चिंचवड.